# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

दिनांक १४.०४.२०२६ मंगळवार

**१) सक्करदरा पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक १४.०४.२०२६ चे ०१.४५ वा. चे सुमारास, सक्करदरा पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, राणी भोसले नगर, शितला माता मंदीरजवळ, भांडेप्लॉट, नागपुर येथे गेले असता तेथे एक संशयीत इसम पोलीसांना पाहुन पळताना दिसुन आला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेवुन, त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव असलम खान उर्फ भु—या दाऊद खान वय ४३ वर्षे, रा. रानी भोसले नगर, भांडेप्लॉट, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०४ यांचे हद्दपार आदेश क्र. ०६/२०२५, दिनांक १६.०७.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे सक्करदरा येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. प्रदीप शिरस्कर, सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रमोद पोरे, पोउपनि. महेश पांडे, पोहवा. टप्पूलाल चुटे, मनोज काळसर्पे, पोअं. किशोर हाते व शरदसिंग टेंभरे यांनी केली.

(गुन्हे)

**पोलीस ठाणे बेलतरोडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १२.०४.२०२६ चे २०.०० वा. ते दिनांक १३.०४.२०२६ चे ०८.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, बंगला नं. २१, स्नेही पार्क, रुईपांजरी, बेलतरोडी, नागपुर येथे राहणारे फिर्यादी कमलकिशोर कृष्णासिंग शर्मा वय ५४ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह बैतुल येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोंखडी आलमारीचे कुलूप तोडून आत ठेवलेले रोख ६५,०००/— रु. व सोन्याचे वेगवेगळे दागिने व एचपी कंपनीचा लॅपटॉप असा एकुण किंमती १,५५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे मपोउपनि. पुनम खिल्लारे ७०६६१२०५२४ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

## (अकस्मात मृत्यु)

**पोलीस ठाणे नंदनवन :—** पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, रतन मदान यांची निर्माणाधीन चार मजली इमारतीचे मागील बाजुस, मोकळया जागेत, प्रजापती चौक, नागपूर येथे साईटवर मजुरीकाम करणारा व तेथेच तिस—या माळयावर ह.मु. राहणारा मजुर नामे दालकाराम प्रेमलाल जुआझार **वय अंदाजे ४३ वर्षे** रा. जुआझार, बैतुल, मध्यप्रदेश हा दिनांक १३.०४.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांस उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल, अजनी येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतक हा दारु पिण्याचे सवयीचा होता. रात्री तो तिस—या माळयावर झोपलेला होता. रात्रीचे दरम्यान झोपेत खाली पडल्याने त्याचा मृत्यू झाला असावा असे सोबत काम करणारे इतर मजुर यांनी सांगितले. याप्रकरणी फिर्यादी मनोज ननकू यादव वय ५५ वर्ष रा. अजनी, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

## (मिसिंग)

**पोलीस ठाणे तहसील :—** कु. परी रवी गौर वय १८ वर्षे, रा. कृष्णा टॉकीजजवळ, संत्रा मार्केट, नागपूर ही दिनांक ०८.०४.२०२६ चे ०७.३० वा. चे सुमारास पोलीस ठाणे तहसील हद्दीतून राहते घरी कोणाला काही न सांगता निघून गेली, आजपावेतो घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा—गोल, बांधा— सडपातळ, उंची— ४ फुट ३ इंच, केस— काळे, अंगात— फिक्कट निळया रंगाची कुर्ती व लॅगीन घातलेली आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलते.

## `(ईतर)

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | को.क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १६वे सहदिवाणी न्यायाधीश तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०५००२१/ १९९८ | कलम ८२ सीआरपीसी | राजकुमार प्रधान वय ३५ वर्ष रा. प्लॉट क्र. १६७, वर्धमान नगर, लकडगंज, नागपूर | २४.०४.२०२६ |
| २ | मा. १६वे सहदिवाणी न्यायाधीश तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०५०२७४/ २००० | कलम ३२३,२९४, ५०६ ब,३४ भादंवि | मोहम्मद अमीन वय २४ वर्ष रा. प्लॉट क्र. ३५१, बाबुलबन चौक, लकडगंज, नागपूर | २०.०४.२०२६ |

स्वा/—

( अंकुश राठोड )

पोलीस उप निरीक्षक,

पोलीस जनसंपर्क अधिकारी,

नागपूर शहर.